| | |
|---|---|
| MHKO110024512024 | <u>नियमित दिवाणी दावा क्र. २३०/२०२४ मधील निशाणी क्रमांक ०८ खाली आदेश</u><br><u>दिपक नागनाथ कुलकर्णी</u><br><u>विरुध्द</u><br><u>काकासाहेब महादेव चव्हाण</u> |

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादीने त्याचेविरूध्द झालेला 'म्हणणे नाही' आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जाखाली नमूद केले असून सदर अर्ज मंजूर करणेस तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला.

०३. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्याचे कामी नि. ३ सोबत ३८ कागद दाखल झाले असून त्याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. तसेच वादी हे स्वत: वकील असून प्रतिवादी हे एक सामान्य शेतकरी आहेत. त्यामुळे वादीने प्रतिवादीविरुध्द केलेल्या फी वसुलीच्या दाव्यास सविस्तर म्हणणे देणे आवश्यक आहे. प्रतिवादी हे सामाजीक व राजकीय कामांमध्ये सहभागी असल्यामुळे कामाच्या व्यापामुळे मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द नि. १ खाली म्हणणे नाही असा हुकूम झाला आहे. प्रस्तुत प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. तसेच सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी करतात.

०४. वादीतर्फे विधीज्ञ यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे राजकीय पुढारी असून माजी सरपंच आहेत. त्यामुळे वादीने दाखल केलेल्या प्रत्येक कागदपत्रांची माहिती व ज्ञान प्रतिवादीला पूर्वीपासूनच आहे. प्रतिवादीला कायद्याचे बरेचसे ज्ञान आहे. तथापि, केवळ प्रतिवादीने वादीला कायदेशीररित्या देय असलेली फी बुडविण्याच्या दुष्ट हेतूने व दाव्याचे कामकाजामध्ये विलंब करण्याकरिता प्रतिवादीने जाणीवपूर्वक वेळेत कैफीयत दाखल केलेली नाही. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केलेली आहे.

०५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीला दाव्याचे समन्स दि. १८.१०.२०२४ रोजी लागू झाले असून दि. २३.१०.२०२४ रोजी ते प्रस्तुत कामी हजर झालेले आहेत. तथापि, वारंवार संधी देऊन देखील प्रतिवादीने वेळेत कैफीयत दाखल न केल्यामुळे त्याचेविरुध्द दि. २२.०१.२०२५ रोजी नि. १ खाली म्हणणे नाही असा आदेश झाला आहे. प्रस्तुत कामी सदरचा अर्ज दाखल करण्यास प्रतिवादी यांनी सुमारे ४ महिन्यांचा कालावधी घेतलेला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जामध्ये अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत नमूद केलेले कारण हे संयुक्तिक वाटत नाही. तथापि, प्रस्तुतचे प्रकरण हे गुणदोषावर चालून निकाली होणेकरीता व मल्टीप्लीसिटी ऑफ प्रोसिडींग टाळण्याकरीता प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतु, प्रतिवादीने कैफीयत देण्यास विलंब केल्यामुळे वादीला जो असोयीस्करपणा झाला त्याकरीता सदर प्रतिवादी यांना भरपाई खर्च लावल्यास योग्य व संयुक्तिक आहे. याकरीता, खालील आदेश पारीत करण्यात येतो-

## आ दे श

प्रतिवादीने रक्कम रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) वादीला देण्याच्या अटीवर प्रस्तुत नि. ८ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**Sd/-**

दि. २४/०४/२०२५ **(** आर**.** एस**.** मोरे **)**

पेठवडगाव ३रे सह दिवाणी न्यायाधीश**,** क**.** स्तर**,** पेठवडगाव